Vol 5 Issue 7 April 2016

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

ISSN: 2249-894X Impact Factor : 3.1402(UIF) Volume - 5 | Issue - 7 | April - 2016

Review Of Research

# महिलांच्या उत्थानात शेतकरी संघटनेचे योगदान – एक अध्ययन

गुरूदास दादाजी बल्की
संशोधक विद्यार्थी इतिहास विभाग,
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**प्रस्तावनाः–**

भारतातील स्त्री.मुक्ती चळवळीचा इतिहास लिहितांना पांढरपेशा शहरी, नोकरदार स्त्रियापुरती मर्यादीत असलेली ही चळवळ ग्रामीण कष्टकरी शेतकरी स्त्रियांपर्यंत नेऊन तिचा परीघ कितीतरी पटींनी वाढविण्याचे काम प्रथम शरद जोशींनी केले त्यासाठी ग्रामीण स्त्रीच्या बरोबरीने वागुन ते संवाद साधायला शिकले. शेतकरी स्त्रीला बोलतं केलं आणि स्त्रीयांना स्वताच्या अन्यायाविरूध्द उभे केले. १९८२ साली सटाणा येथे भरलेल्या शेतकरी संघटनेच्या पहिल्या अधिवेशनात शेतकरी महिला आघाडी स्थापनेची पार्श्वभूमी तयार झाली. या अधिवेशनामध्ये शरद जोशी यांच्या पत्नी लीला जोशी यांनी आपल्या भाषणात शेतकऱ्यांच्या संघटनेबरोबर शेतकरी महिलांचीही संघटना असावी असे मत मांडले. यानंतर खऱ्या अर्थाने शरद जोशींनी महिलांना शेतकरी संघटनेमध्ये सामावून घेण्यासाठी ग्रामीण शेतकरी महिलांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी स्त्रियांची शिबीरे घेण्याची कार्य सुरू केले. याच प्रयत्नातून १९८६ मध्ये चांदवड (जि. नाशिक) येथे स्त्रियांच अधिवेशन भरविल्या गेले.१ या अधिवेशनाची फलनिष्पती म्हणजे अधिवेशनाला उपस्थित असलेल्या स्त्रीयांची संख्या होय. खऱ्या अर्थाने या अधिवेशनानंतर शेतकरी संघटनेच्या महिला आघाडीचा पाया रोवला गेला आणि यातुनच पुढील काळात शेतकरी महिलाविषयक समस्या सोडविण्यासाठी, स्वतः कष्टकरी असुन सुध्दा लाचारीचे जीवन जगणाऱ्या स्त्रीला बळकट करण्यासाठी शेतकरी संघटनेने प्रयत्न केले.



यामध्ये शेतकरी महिला आघाडीची स्थापना, महिलांच्या राजकीय सहभागाची योजना, महिलांच्या संपत्ती अधिकाराची फेरमांडणी, लक्ष्मीमुक्ती अभियानाद्वारे स्त्रीयांच्या नावे शेती करण्याचे शेतकरी पुरूषांना आवाहन, दारूदुकान बंदी आंदोलन, पंचायत राज बळकावं आंदोलन यासारख्या मार्गानी स्त्रीयांच्या प्रश्नांची सोडवणुक करतानाच ग्रामीण स्त्रियांच्या सबलीकरणात शेतकरी संघटनेचे मोलाचे योगदान आहे.

### 1) शेतकरी संघटनेची स्थापना –

भारताला सन १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले परंतू भारतातील शेतकऱ्याची स्थिती जैसे थे होती. शेतकऱ्यांच्या समस्या उत्तरोत्तर वाढत होत्या. राजकीय धोरण, बाजारव्यवस्थेतील दलाल या सर्व मध्यस्थामुळे शेतकरी नागवला गेला. स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रात शेतकरी चळवळीला नवसंजीवनी दिली ती ८०च्या दशकातील उत्तरार्धात शरद जोशी यांनी स्थापन केलेल्या शेतकरी संघटनेनी. उच्च विद्याविभुषीत, संयुक्त राष्ट्रात नोकरी करणारे, शेतीविषयीचा कुठलाही अनुभव पाठीशी नसलेले शरद जोशी यांनी भारतात वेगवेगळया अधिकार पदावर काम करीत संयुक्त राष्ट्र संघापर्यंत झेप घेतली. संयुक्त राष्ट्रसंघात काम करताना त्यांनी जगातील शेतकरी आणि भारतातील शेतकऱ्याची स्थिती याचा तुलनात्मक अभ्यास केला. सरकारची शेतकऱ्याबद्दलची धोरणं आणि त्यामुळे त्यांची झालेली दैन्यावस्था पाहुन ते अस्वस्थ झाले. या अस्वस्थेतुन त्यांनी युनो मधील नोकरीचा राजीनामा दिला आणि ते भारतात परतले. भारतात परतल्यानंतर पुणे जिल्हयातील आंबेठाण येथे कोरडवाहु शेती घेऊन शेती करण्याचा निर्णय घेतला आणि यातुन शरद जोशींना शेतकऱ्यांच्या दुःखाचे कारण कळले. म्हणुनच १९७९ मध्ये त्यांनी शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढणाऱ्या एका शेतकरी संघटनेची स्थापना केली.२ शेतकरी आंदोलनाच्या माध्यमातुन शेतकऱ्यांच्या हिताच्या त्यांनी अनेक मागण्या मान्य करून घेतल्या.

प्रसंगी सरकारला शेतीविषयक धोरणे बदलण्यास भाग पाडले.

शेतकरी संघटनेने शेतकऱ्यांच्या शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारीत रास्त भाव मिळावा यासाठी सातत्याने प्रयत्न केला आहे. या एक कलमी कार्यक्रमासाठी कांदा, ऊस, तंबाखु, दुध, भात, कापुस, ज्वारी इत्यादी पिकाच्या शेतकऱ्यांच्या आंदोलनांचे नेतृत्व शरद जोशी यांनी करून ही सर्व आंदोलने यशस्वी केली.

महाराष्ट्रात शेतकरी संघटना स्थापन झाल्यानंतर शेतकरी वर्गाच्या न्याय मागण्यासाठी शेतकरी संघटनेतर्फे शरद जोशीच्या नेतृत्वात वेळोवेळी मोर्चे, आंदोलन होऊ लागली. यासाठी हजारोच्या संख्येने शेतकरी वर्ग उपस्थित होऊ लागला. परंतु या सर्व आंदोलनामध्ये शेतकरी स्त्रीयांचे स्थान किंवा भूमिका काय? हा विचार समोर येऊन शेतकरी महिला आघाडीच्या स्थापनेसाठी प्रयत्न होऊ लागले.

### *2) शेतकरी महिला आघाडीची स्थापना –*

आपल्या समाजात स्त्रीचे काम म्हणजे फक्त चुल आणि मुल सांभाळणे एवढच पुर्वीपासुन चालत आलेलं आणि याच वाक्याच अनुकरण आपण स्वतःला पुढारलेले समजणाऱ्या समाजानी सुध्दा मुक्त हस्तानी केलं. खरे पाहिले तर कुठलेही कार्य करताना ते कार्य स्त्री शिवाय पुर्ण होणे अशक्यच. तरी सुध्दा स्त्री दुर्लक्षीतच राहीली. स्त्रीला कुठलाच अधिकार नाही, यामध्ये वडीलोपार्जीत संपत्ती असो की पतीकडची संपत्ती असो कुठल्याही संपत्तीवर स्त्रीचा अधिकार नाकारल्या गेला. स्त्री ही फक्त उपभोगाचे साधन एवढेच समजून तीचं आजतागायत शोषण होत आलं मात्र या बाबींना शेतकरी संघटनेनं छेद दिला. शेतकरी महिलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शरद जोशी प्रणीत शेतकरी संघटनेने मोलाची कामगीरी केली. एरवी घरकाम सांभाळुन घर. धनी सांगेल तेवढेच काम करणाऱ्या महिलांमध्ये शरद जोशीनी जागृती निर्माण करून त्यांना बोलते करण्याचा प्रयत्न केला. या कार्यासाठी शरद जोशींनी १९८०-१९८४ या काळात महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील गावे पिंजुन काढली आणि ग्रामीण शेतकरी स्त्रीयामध्ये जागृती निर्माण केली.[३]

या कार्याचा परिपाक म्हणजेच ९ व १० नोव्हेंबर १९८६ साली भरलेलं चांदवड (जि. नाशिक) येथील शेतकरी महिला अधिवेशन होय. या अधिवेशनामध्ये लाखोच्या संख्येने खेडयापाडयातुन शेतकरी स्त्रिया स्वयंस्फुर्तीने उपस्थित झाल्या. शेतकरी स्त्री च्या दृष्टीने चांदवडचं महिला अधिवेशन तीच्या भाव.भावनाचे ओझे उतरविणारे ठरले. तिचं आत्मभान जागे झाले, घरात स्वतःला सन्मानाचे स्थान मिळविण्यासाठी ती जितकी जागृत झाली, तितकीच आपल्या घरधण्याला लुटणाऱ्यांच्या विरोधातील आर्थिक लढाईत देखील उतरली.[४]

ज्या स्त्रीने घराचा कधी उंबरठा सुध्दा ओलांडला नव्हता. त्या स्त्रीने स्वतःचे गाव, जिल्हा ओलांडुन आपल्या मधील स्त्री संघटनेचे ताकद काय आहे हे शेतकरी संघटनेच्या होणाऱ्या आंदोलनात सहभागी होवून दाखवून दिले. या अधिवेशनामधील शेतकरी स्त्रीचा उत्स्फुर्त प्रतिसाद हा आजपर्यंत दबलेल्या किंवा दाबुन ठेवलेल्या, सतत शोषण सहन करणाऱ्या स्त्रीयांचा भावी कार्यासाठी सज्ज असल्याचा पुरावा होता. याच अधिवेशनात शेतकरी महिला आघाडीची स्थापना करण्यात आली आणि समोर जाऊन महिलांसाठी विविध उपक्रम राबविले गेले.

सध्या स्थितीमध्ये होणाऱ्या विविध आंदोलनामध्ये स्त्रियांच्या वाढत्या सहभागातुन आपल्याला शेतकरी संघटनेने स्थापन केलेल्या शेतकरी महिला आघाडीच्या कार्याची प्रचीती येते. आज महिला स्वंयपूर्ण झाल्या असून संपूर्ण क्षेत्रामध्ये पुरूषांच्या बरोबरीने कार्य करतांना आढळतात यामध्ये विविध आंदोलनातील स्त्रियांचा सहभाग हा उल्लेखनीय आहे. दारू बंदी आंदोलन असो की स्त्री शोषणा विरोधातील आंदोलन असो यामध्ये स्त्री ही स्वतः जबाबदारीने भाग घेऊन आपल्या न्याय मागण्या पूर्ण करण्यासाठी सरकारला भाग पाडत आहे.

### *3) महिलांचा राजकीय सहभाग :–*

शेतकरी संघटनेच्या महिला आघाडीने शेतकरी स्त्रियांमध्ये जागृती निर्माण करण्याचे कार्य केले. चार भींतीच्या आत जीवन जगत असलेल्या स्त्रीला शेतकरी संघटनेने राजकीय व्यासपीठ दिलं. चांदवडच्या अधिवेशनात स्त्रियासंबंधीचे कामे ज्या संस्थामध्ये होतात त्या स्थानिक स्वराज्य संस्थानचे कारभार सर्वतोपरी स्त्रियांच्या हाती असावा यासाठी शेतकरी संघटनेने पंचायत राज संस्थाच्या निवडणुकात १०० टक्के महिला पॅनेल्स उभी करण्याचे जाहीर केले. त्याचा धसका म्हणुन शंकरराव चव्हाणाच्या कारकीर्दीत जिल्हा परिषद आणि पंचायत समीती यांच्या निवडणुका त्यांची मुदत संपुनही तीन वर्षे झाल्याच नाहीत. शेवटी शेतकरी महिला आघाडीने जिल्हा परिषद व पंचायत समीती बळकाव आंदोलनाचा धक्का दिल्यावरच सरकारला त्या घेणे भाग पडले.[५] यानंतर झालेल्या निवडणुका मध्ये काही स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये शेतकरी महिला आघाडीच्या १०० टक्के महिला निवडुन आल्या तसेच महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेत सुध्दा शेतकरी महिला आघाडीच्या स्त्रिया निवडुन आल्या.

सरकारने शेतकरी महिला आघाडीच्या १०० टक्के महिला पॅनलच्या कार्यक्रमाला शह देण्यासाठी ३३ टक्के आरक्षणाची क्लुप्ती काढली. शरद जोशीच्या शेतकरी संघटनेनी महिलांना सक्षम करण्याचे कार्य केलं.[६] पूर्वी घरात चालणारी चर्चा दाराआडुन एकणारी ग्रामीण स्त्री आता हजारो संख्येच्या समुदायाला संबोधीत करू लागली. स्त्रियांच्या या बदलावर शरद जोशी म्हणतात की, लाऊडस्पीकर कडे चालत येणारी मुलगी ही एखाद्या हरीणी किंवा शेळी सारखी येते आणि एकदाची बोलते पहिल्यांदा घाबरते पण तिथुन परत जाताना तिला असं वाटत की आणखी बोलायला पाहिजे होतं, त्या पुष्कळदा येतात की आम्हाला आणखी थोड बोलु द्या, त्यामुळे जाताना त्याचे डोळे वाघीणीचे होतात. महीला कार्यकर्त्यांची खाण ही फक्त शेतकरी महिला आघाडीतच आहे."[७]

शेतकरी संघटनेने ग्रामीण स्त्रियांना व्यासपीठ दिले. याचे पडसाद आज ग्रामीण भागात दिसुन येते. ग्रामपंचायत, पंचायत

समिती, जिल्हा परिषद असो किंवा कृषी उत्पन्न बाजार समितीचे राजकारण असो यामध्ये ग्रामीण स्त्रिया हिररीने सहभागी होतांना आपल्याला दिसुन येते. एवढच नव्हे तर स्त्री सहभागावरून निवडणुकीच्या निकालाचा अंदाजही बांधता येऊ लागलेला आहे. पुर्वी पुरूषांच्या पाठीमागे स्त्री उभी रहायची हे जरी खरे असले तरी आजचे चित्र मात्र वेगळे दिसते. स्त्री संघटन हे राजकीय लोकशाहीचे यशस्वीपण आहे असे दिसुन येते.

### *4) लक्ष्मीमुक्ती अभियान –*

शेतकरी संघटनेने चांदवडच्या महिला अधिवेशनामध्ये शेतकरी महिला आघाडीची स्थापना केली आणि त्यातुन स्त्रियांना मुख्य प्रवाहात सामावून घेण्याचे कार्य सुरू झाले. ग्रामीण शेतकरी स्त्रीच्या नावाने कुठलीही संपत्ती किंवा मालमत्ता नव्हती. तेव्हा शेतकरी संघटनेने शेतकरी स्त्रीला सर्वकष सक्षम करण्याच्या उद्देशाने लक्ष्मीमुक्ती आंदोलन चालविलं.

नव्वदच्या दशकातील शेतकरी संघटनेनं चालविलेलं लक्ष्मीमुक्ती आंदोलन हे शेतकरी संघटनेच्या आंदोलनातील एक महत्वपूर्ण आंदोलन म्हणावं लागेल. घरातील लक्ष्मी म्हणुन ज्या स्त्री चा आपण उदोउदो करतो, प्रत्यक्षात मात्र त्या स्त्री च्या नावावर कुठलीच संपत्ती नसते. प्रत्येक वेळी तीला कुठलाही खर्च करायचा झाला तर नवऱ्यासमोर हात पसरावा लागतो. ग्रामीण शेतकरी स्त्री च्या संदर्भात बोलायच तर पहाटे पासुन तर रात्री अंथरूणावर पडण्यापर्यंत शेतकऱ्याची लक्ष्मी ही रोज १५ ते १६ तास सारखी काम करीत असते म्हणुन जर शेतकऱ्याला घामाचे दाम हवे तर त्यांच्या दुप्पट त्यांच्या लक्ष्मीला मिळायला हवे. हे शरद जोशीनी अगदी गणिताचा आधार घेऊन स्पष्ट केले आणि यातुनच लक्ष्मीमुक्ती अभियानाला सुरूवात झाली.[८]

शरद जोशीच्या शेतकरी संघटनेने सुरू केलेला लक्ष्मीमुक्ती अभियाना अंतर्गत शरद जोशीनी महाराष्ट्रातील शेतकऱ्याला आवाहन केले की शेतकऱ्यांनी आपली शेती आपल्या पत्नीच्या नावे करावे. या आवाहनाला साद घालत शेतकरी पुरूषांनी आपापल्या घरच्या लक्ष्मीला जमीनीची मालकी देऊन आपल्यात झालेल्या बदलाचा पुरावा दिला. शेतकरी संघटनेच्या ज्या पाईकाकडे जमीनच नाही त्यांनी आपल्या व्यवसायातील फायदा, घर किंवा असलेल्या अन्य मालमत्तेत आपल्या लक्ष्मीला हिस्सेदार केल्याची उदाहरणेही बरीच आहे.[९]

शतकानुशतके ज्या स्त्रीला फक्त भोगवादाची वस्तु म्हणून तिच्याकडे पाहिलं गेलं त्या स्त्रीला शेतकरी संघटनेने पुर्णपणे सक्षम करून तीला शेतीची मालक बनविलं. शेतकरी पुरूषांनी संपत्ती तीच्या नावावर करणे ही खरच अविश्वसनीय गोष्ट होती.

या लक्ष्मीमुक्ती अभियानाचे यशस्वीपण म्हणजे महाराष्ट्र सरकारने १९९४ साली काढलेला लक्ष्मीमुक्तीचा अध्यादेश होय. १० १९९४ ते आजतागायत महिलांचे स्त्री सबलीकरणाच्या माध्यमातुन आज पुरूष प्रधान संस्कृतीच्या एका दडपणाखाली न राहता स्वातंत्र्याचा उपभोग घेत स्वतःचे कुटूंब चालविण्याचे मनोधैर्य वाढले आहे. म्हणुनच देशाच्या प्रगतीमध्ये व कृषी क्षेत्राच्या विकासामध्ये ग्रामीण महिलाचे योगदान आहे. ज्यामध्ये महिलांचे महिला गटांच्या माध्यमातुन शेतीसाठी कर्ज पुरवठा करणे, कृषी अवजारे खरेदीकरिता सहायता निधी उभारणे हे कार्य त्या स्वजागृतीतून करित आहे म्हणजेच आज स्त्री–पुरूष समानतेचे खरं मुल्य ग्रामीण भागात रूजतांना दिसुन येते.

### *5) दारू दुकान बंदी आंदोलन –*

गावोगावी उघडलेली सरकारमान्य दारूची दुकाने ही राजकारण्यांचा वरदहस्त लाभलेल्या गुंडाचे अड्डे बनल्याची आणि त्यामुळे नागरीकांना, विशेषतः स्त्रीया–मुलींना रस्त्यातुन येणे–जाणे असुरक्षीत झाल्याची नोंद शेतकरी महिला आघाडीने गंभीरपणे घेऊन दारू दुकान बंदीचे आंदोलन छेडले. दारूमुळे ग्रामीण भागात अनेक संसाराची वाताहत होत होती आणि याचा सर्वात जास्त त्रास स्त्रियांनाच भोगावा लागत होता. त्यामुळे या अशा संसार उध्वस्त करणाऱ्या दारू दुकान बंदीसाठी शेतकरी महिला आघाडीने पाऊल उचलले.

चांदवडच्या अधिवेशनातुन आत्मभान घेऊन बाहेर आलेल्या शेतकरी स्त्रियांनी रणरागिणींचा अवतार धारण करत समाजातील गुंड, त्याला संरक्षण देणारे प्रशासन व पुढारी यांच्या दडपशाहीला भीक न घालता गावोगावी दारू दुकाने बंद करण्याचा धडाका लावला. चांदवडच्या अधिवेशनानंतर आपल्या पुरूषपणाच्या अहंकाराला तिलांजली देत शेतकरी पुरूषांनी सुध्दा या महिलांना बळ दिले. परिणामी सरकारने अध्यादेश काढुन ही दुकाने बंद करण्याचा पर्याय जनतेला द्यावा लागला.[११]

एकंदरीत लक्षात येते की शेतकरी संघटनेच्या महिला आघाडीनी दारू दुकान बंदी आंदोलन करून स्त्रियांमध्ये गावा–गावात जागृती करून त्यांना या आंदोलनासाठी एकत्रीत केलं. याचे पडसाद आजही समाजात उमटत आहे. याचे उदाहरण म्हणजे महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यात झालेली दारूबंदी होय. चंद्रपूर जिल्ह्यात दारूबंदी व्हावी म्हणुन चंद्रपूर जिल्ह्यातील स्त्रियांनी सरकारवर दबाव आणुन जिल्ह्यात दारूबंदी करून घेतली आणि यामध्ये स्त्रिया आघाडीवर होत्या. यावरून असे लक्षात येते की आता स्त्रियांचे संघटन होऊ लागले आहे, तिचा आंदोलनामध्ये सहभाग वाढत आहे, कौटुंबिक जबाबदाऱ्या सोबतच समाजकारण, राजकारण ही स्त्रियांचे बलस्थाने होत आहेत. म्हणुनच भारतासारख्या कृषी प्रधान राष्ट्रामध्ये शेतकरी संघटनेच्या माध्यमातुन स्त्रिया समोर येणे हे वरदान मानावे लागेल.

### *सारांश*

महिलांच्या उत्थानात शेतकरी संघटनेचे योगदान लक्षात घेताना शेतकरी संघटनेने महिलांच्या उत्थानासाठी केलेली विविध आंदोलने लक्षात घेतली असता शेतकरी संघटना ही शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी, शेतकऱ्यांच्या उत्पादीत शेतमालाला रास्त भाव मिळावा यासाठी स्थापन झालेली होती परंतू या सर्व घडामोडीमध्ये शेतकऱ्यांची स्त्री ही दुर्लक्षीत राहीली होती आणि स्त्री शिवाय कुठलेही काम

पुर्ण होत नाही, या उक्तीप्रमाणे या दुर्लक्षीत घटकाला न्याय देण्यासाठी शरद जोशीनी महिलांना जागृत करून त्यांच्यामधे आत्मविश्वास निर्माण केला. शेतमालाला भाव न मिळाल्याने शेतकऱ्यांचे जे आर्थिक शोषण होते त्या शोषणाचाच अपरिहार्य परिणाम ग्रामीण शेतकरी महिलेचं शोषण आहे ही नवी मांडणी शरद जोशीनी केली. त्यांची ही मांडणी स्त्री चळवळीला नवी दिशा देणारी ठरली आणि हेच भान त्यांनी शेतकरी स्त्रीला देऊन तिला शोषणा विरूद्धच्या लढयात उभं केलं. या आंदोलनामधुन शेतकरी स्त्री मध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. परिणामी ही शतकानुशतके शोषीत स्त्री शोषणाविरोधात प्रतिकार करण्यासाठी सज्ज झाली. आपल्या समस्या सोडवून घेण्याकरीता ती पुढे सरसावली, मुलामुलीच्या आरोग्याचा व शिक्षणाचा प्रश्न, कुटूंबातील आपल्या स्थानाचा विचार, मुलीला कमी न लेखण्याचा निर्धार, आर्थिक लुटीचा विरोध करण्याच्या जागरूकतेसोबतच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कारभारात बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने सत्तेत स्थान मिळवून घेण्याकरीता सिध्द झाली.

परिणामी शासनाला महिला विषयक धोरण बदलावे लागले. एकंदरीत शेतकरी महिला आघाडीने पीढयान.पिढया अबोल असलेल्या स्त्रीला बोलते केलं. स्वतःचे निर्णय घेण्याकरीता सक्षम बनविलं आज आपल्यात जे स्थानीक स्वराज्य संस्थेपासुन तर राज्याच्या राजकारणात स्त्रींयाचा सहभाग दिसतो. त्यामागे शेतकरी महिला आघाडीचे महत्वाचे योगदान आहे.

### *संदर्भ*


१.दै. लोकसत्ता, शरद जोशी यांचा लेख, स्त्रियांचे प्रश्न अन् 'चांदवडची शिदोरी' दि. ६ फेब्रुवारी, २०१३
२.दै लोकसत्ता, विशेष संपादकीय, दि. १३ डिसेंबर, २०१५
३.दै. लोकसत्ता, वसुंधरा काशीकर यांचा लेख, आत्मभान शेतकरी स्त्रीचे दि. १६ जानेवारी, २०१६
४.शरद जोशी, चांदवडची शिदोरीः स्त्रियांचा प्रश्न, जनशक्ती वाचक चळवळ प्रथमावृत्ती २०१० पृ. ८-६
५.दै. लोकसत्ता, शरद जोशी यांचा लेख, स्त्रियांचा प्रश्न : आम्ही मरावं किती? दि० २० फेब्रुवारी, २०१३
६.कित्ता
७.चतुरंग प्रतिष्ठान, दैनंदिनी युक्त स्मराणीका प्रकाशन, पृ. ३६
८.शदर जोशी, चांदवडची शिदोरीः स्त्रियांचा प्रश्न, जनशक्ती वाचक चळवळ, प्रथमावृत्ती २०१०, पृ. १३
६.दै. लोकसत्ता शरद जोशीचा लेख, स्त्रियांचा प्रश्न : आम्ही मरावं किती? दि. २० फेब्रुवारी, २०१३
१०. शदर जोशी, चांदवडची शिदोरीः स्त्रियांचा प्रश्न, जनशक्ती वाचक चळवळ, प्रथमावृत्ती २०१०, पृ. ६
११.दै. लोकसत्ता, शरद जोशी यांचा लेख, स्त्रियांचा प्रश्न : आम्ही मरावं किती? दि० २० फेब्रुवारी, २०१३

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org